




सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २३७ • गुरुवार दि.१८ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.


## सहा खासदारांची बैठकीला दांडी; उद्या शिंदे गटात प्रवेश?

### काँग्रेसमध्ये विलिनिकरणाचा गंभीर आरोप

मुंबई/नवी दिल्ली : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला संसदेत मोठा धक्का बसण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहे. आज बोलावण्यात आलेल्या संसदीय पक्षाच्या बैठकीला केवळ तीन खासदार उपस्थित होते. सहा खासदारांच्या बंडखोरीवर आता शिक्कामोर्तब झाले आहे. दरम्यान, बंडखोर खासदारांनी लोकसभा अध्यक्षांकडे सादर केलेल्या कथित पत्रामुळे या राजकीय घडामोडींना अधिक वेग आला आहे. दरम्यान हे खासदार उद्या जयपूरहून खास विमानाने मुंबईत दाखल होणार आहेत. शिवसेनेच्या वर्धापन दिन मेळाव्यात हे सहा खासदार एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत पक्षप्रवेश करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

लोकसभेतील शिवसेना (उबाठा) संसदीय पक्षाचे नेते अरविंद सावंत यांनी सर्व खासदारांना व्हीप बजावत बैठक बोलावली होती. मात्र, या बैठकीला अरविंद सावंत, अनिल देसाई आणि राजाभाऊ वाजे हेच तीन खासदार उपस्थित राहिले. ओमराजे निंबाळकर, भाऊसाहेब वाकचौरे, संजय जाधव, संजय देशमुख, संजय दिना पाटील आणि नागेश पाटील आष्टीकर हे सहा खासदार अनुपस्थित राहिल्याने पक्षांतराच्या चर्चांना अधिक बळ मिळाले आहे.

**शिंदे गटात प्रवेशाची शक्यता**

दिल्लीतील हालचालीनंतर हे सहा खासदार जयपूरमध्ये थांबले होते. तेथून ते मुंबईत दाखल होणार असून गोरेगाव येथील वेस्टीन हॉटेलमध्ये त्यांच्या मुक्कामाची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती आहे. शुक्रवारी नेस्को सेंटरमध्ये होणाऱ्या शिवसेनेच्या ६० व्या वर्धापन दिन सोहळ्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हे खासदार शिंदे गटात प्रवेश करतील, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

**काँग्रेसमध्ये विलिनीकरणाचा आरोप**

बंडखोर खासदारांनी लोकसभा अध्यक्षांकडे सादर केलेल्या कथित पत्रात पक्ष मूळ हिंदुत्ववादी विचारधारेपासून दूर गेला असून वरिष्ठ नेतृत्व काँग्रेसमध्ये विलिनीकरणाच्या दिशेने जात असल्याचा आरोप करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे. तसेच आपण शिवसेना (एकनाथ शिंदे) गटात विलीन होत असल्याचेही या पत्रात नमूद करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

**आसन व्यवस्थेत बदलाची मागणी**

बंडखोर खासदारांनी लोकसभा अध्यक्षांकडे संसदेतील आसन व्यवस्था बदलून शिंदे गटाच्या सदस्यांसोबत बसण्यास परवानगी देण्याची विनंती केल्याची माहिती आहे. त्यामुळे संसदेत शिवसेनेच्या दोन्ही गटांतील संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

**पक्षांतरबंदी कायदा ऐरणीवर**

व्हीपचे उल्लंघन केल्या प्रकरणी ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेतली असून अनुपस्थित सहा खासदारांविरोधात पक्षांतरबंदी कायद्यानुसार कारवाई करण्यासाठी लोकसभा ***पान ४ वर***

## अमेरिका-इराण युद्धाला अखेर पूर्णविराम



नवी दिल्ली:गेल्या तीन महिन्यांपासून संपूर्ण जगाला तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर नेणाऱ्या अमेरिका आणि इराणमधील संघर्षाला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. दोन्ही देशांदरम्यान ऐतिहासिक शांतता करार झाला असून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियन यांनी करारावर स्वाक्षऱ्या करून युद्ध समाप्तीची अधिकृत घोषणा केली आहे.

दोन्ही देशांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, करारातील अटी तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आल्या असून युद्धानंतर निर्माण झालेला तणाव कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात येणार आहेत. या घोषणेनंतर जागतिक शेअर बाजार आणि तेल बाजारातही सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. सुरुवातीला या कराराच्या अंतिम मंजुरीसाठी स्वित्झर्लंडमध्ये भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, राजनैतिक कारणांमुळे तो कार्यक्रम रद्द करण्यात आला. त्यानंतर फ्रान्समधील जी-७ शिखर परिषदेनंतर राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी पॅरिसजवळील ऐतिहासिक व्हर्साय पॅलेसमध्ये फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या उपस्थितीत करारावर स्वाक्षरी केली. स्वाक्षरीनंतर ट्रम्प यांनी हा महत्त्वाचा दस्तऐवज अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी उपस्थित विविध देशांच्या मुत्सद्द्यांनी टाळ्यांच्या गजरात या निर्णयाचे ***पान ४ वर***

## नांदेड विधान परिषदेसाठी ९९.७८ टक्के मतदान



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड स्थानिक स्वराज्य संस्थेच्या द्विवार्षीक निवडणुकीसाठी ४५२ मतदारांपैकी ४५१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. जिल्ह्यातील ८ मतदान केंद्रांवर सरासरी ९९.७८ टक्के मतदान झाले असून निवडणुकीची मतमोजणी सोमवार दि.२२ जून रोजी होणार आहे.

नांदेड स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भाजप व महायुतीचे अमरनाथ राजूरकर, महाविकास आघाडीचे पुरस्कृत कृष्णा पाटील आष्टीकर व वंचित बहुजन आघाडीचे प्रशांत इंगोले हे तीन प्रमुख उमेदवार निवडणूक रिंगणात होते. महायुतीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आ.प्रताप पाटील चिखलीकर यांनी आपले पुत्र प्रविण पाटील चिखलीकर यांचा उमेदवारी अर्ज मागे घेतला. युतीचा धर्म पाळत त्यांनी अमरनाथ राजूरकर यांना पाठिंबा दिल्याने राजूरकरांचे पारडे निवडणुकीत जड झाले होते. काही अदृश्य शक्तीही भाजपच्या उमेदवाराच्या पाठीमागे उभ्या होत्या. महाविकास आघाडीकडून खा.नागेश पाटील आष्टीकर यांचे पुत्र कृष्णा पाटील आष्टीकर हे निवडणुकीत नशिब आजमावत आहेत. दोन दिवसांपूर्वीच कृष्णा पाटील यांचे वडील खा.नागेश पाटील आष्टीकर यांनी बंडाचा झेंडा रोवून शिंदे सेनेच्या वाटेवर आहेत. त्यामुळे काँग्रेस व उबाठा सेनेच्या नगरसेवकांमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. वंचित बहुजन आघाडीच्यावतीने प्रशांत इंगोले यांनीही आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवला होता. गेल्या आठ ते दहा दिवसांपूर्वी भाजपच्या उमेदवाराने मतदारांना पर्यटनासाठी गोव्याला पाठविले होते. हे सर्व मतदार बुधवारी नांदेड जिल्ह्याच्या सिमेवर एकत्र आले. मतदारांना खा.अशोक चव्हाण, आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्यासह महायुतीच्या नेत्यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर हे सर्व मतदार वाहनाद्वारे आज सकाळी आपल्या गावी पोहचले होते. जिल्ह्यातील किनवट, हदगाव, भोकर, नांदेड, कंधार, धर्माबाद, बिलोली व देगलूर येथील मतदान केंद्रांवर आज कडक पोलीस बंदोबस्तात मतदान घेण्यात ***पान ४ वर***

## बॅग लिफ्टिंग प्रकरणातील फरार आरोपीस अटक

नांदेड/प्रतिनिधी-जुना मोंढा भागातील एका व्यापाऱ्याची साडेदहा लाख रुपये रक्कम असलेली बॅग चोरुन नेल्याच्या घटनेतील फरार आरोपीस अडीच महिन्यानंतर स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी आज अटक केली आहे.

शहरातील जुना मोंढा भागात ३० मार्च २०२६ रोजी रात्री ८ च्या सुमारास आडतच्या दुकानात बसलेले जालना येथील व्यापारी सोहनलाल मोतीलाल परमार यांना आरोपींनी चाकुचा धाक दाखवून त्यांच्या जवळील साडेदहा लाख रुपये रक्कम असलेली बॅग हिसकावून घेवून आरोपी पळून गेले होते. याप्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेतील काही आरोपींना पोलीसांनी अटक करुन त्याच्या जवळून रक्कम जप्त केली. गेल्या अडीच महिन्यापासून या गुन्ह्यातील आरोपी निखील संभाजी वाठोरे (वय १९) रा.सुमेधनगर, नांदेड हा फरार होता. सदरील आरोपी नांदेड शहरातील पूर्णा रोडवर असलेल्या शेतकरी पुतळा परिसरात असल्याची माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांना मिळाली. पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार महेश कोरे व कर्मचाऱ्यांनी निखील वाठोरे यास आज (गुरवार) अटक केली आहे.

## खा.आष्टीकर यांचा प्रतिकात्मक पुतळा शिवसैनिकांनी जाळला

नांदेड/प्रतिनिधी-शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी पक्षाशी गद्दारी करुन शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाशी बेईमानी करणाऱ्या खा.आष्टीकर यांच्या फोटोला शिवसैनिकांनी जोडे मारुन त्यांचा प्रतिकात्मक पुतळा आज (गुरुवार) दुपारी जाळला आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सहा खासदार फोडण्यात यशस्वी झाले आहेत. बंडखोर खासदारांमध्ये नागेश पाटील आष्टीकर यांचा समावेश असल्याने शिवसैनिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. सहा खासदारांनी लोकसभा अध्यक्षांना पत्र देवून लोकसभेत वेगळा गट स्थापन करण्याची मागणी केली. शुक्रवारी सर्व सहाही बंडखोर खासदार हे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. त्यामुळे



(छाया : करणसिंह बैस)

शिवसैनिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून ठिकठिकाणी आंदोलन करण्यात येत आहे. आज (गुरुवार) दुपारी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर ***पान ४ वर***

## नांदेडचा 'सस्पेन्स' आणि बदललेल्या निष्ठांचा कस

दृष्टीक्षेप

प्रदीप नागापूरकर

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या विधान परिषद निवडणुकांचा धुरळा अखेर आज मतदानाच्या रूपाने शांत होत आहे. राज्यातील एकूण जागांपैकी ६ जागांवर आधीच बिनविरोध निवडणुका पार पडल्या असल्या, तरी उर्वरित जागांसाठी आज प्रत्यक्ष मतदान पार पडत आहे. या संपूर्ण प्रक्रियेत राज्याचे लक्ष वेधून घेतले आहे ते -'नांदेड स्थानिक प्राधिकार मतदारसंघाने'-. एकेकाळी राजकीयदृष्ट्या अत्यंत सरळ आणि एकाधिकारशाहीचा वाटणारा हा मतदारसंघ मतदानाच्या ऐन तोंडावर घडलेल्या प्रचंड राजकीय भूकँमामुळे कमालीचा अनपेक्षित, गुंतागुंतीचा आणि नाट्यमय बनला आहे. राजकारणातील मैत्री, सोयीची गणिते आणि तत्त्वांना तिलांजली देणारी बंडखोरी या निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे.

या निवडणुकीत महाविकास आघाडीकडून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे चिरंजीव कृष्णा पाटील आष्टीकर हे मैदानात उतरले आहेत. सुरुवातीला महाविकास आघाडीमध्ये ही जागा काँग्रेसकडे जाणार असे जवळपास निश्चित मानले जात असताना, वरिष्ठ पातळीवर अचानक चक्रे फिरली आणि काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराने अनपेक्षित माघार घेतली. या नाट्यमय घडामोडीनंतर कृष्णा आष्टीकर यांना महाविकास आघाडीची उमेदवारी मिळाली. मात्र, हा धक्का ओसरत नाही तोच, मतदानाला अवघे काही तास शिल्लक असताना जिल्ह्यात दुसरा आणि सर्वात मोठा राजकीय भूकंप झाला. खा.नागेश पाटील आष्टीकर यांनी थेट ठाकरेंच्या शिवसेनेला 'जय महाराष्ट्र' करत उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत







जाहीर प्रवेश केला.

वडिलांनी थेट सत्ताधारी महायुतीसोबत घरोबा केल्यामुळे, विरोधी पक्षात असलेल्या महाविकास आघाडीच्या अधिकृत तिकिटावर आणि चिन्हावर लढणाऱ्या मुलाची कमालीची राजकीय कोंडी झाली आहे. वडिलांच्या या धक्कादायक बंडखोरीमुळे आता महाविकास आघाडीतील मुख्य घटक पक्ष असलेल्या काँग्रेस आणि ठाकरेंच्या शिवसेनेच्या स्थानिक मतदारांसमोर (नगरसेवक) नेमके कोणाला मतदान करावे, असा गंभीर यक्ष प्रश्न निर्माण झाला आहे. आपल्याच आघाडीच्या तिकिटावर लढणाऱ्या, परंतु आता तांत्रिक दृष्ट्या महायुतीच्या गोटात गेलेल्या खासदाराच्या मुलाला मत द्यायचे की थेट विरोधी उमेदवाराला, या संभ्रमात मविआचे स्थानिक लोकप्रतिनिधी अडकले आहेत. हा पेच मतदानाच्या दिवशी प्रत्येक लोकप्रतिनिधीच्या मनात कमालीची धाकधूक वाढवणारा ठरत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे इथे मतदार हे सर्वसामान्य नागरिक नसून जनतेने निवडून दिलेले नगरसेवक आणि जिल्हा परिषद सदस्य असतात. मतदारसंख्या अत्यंत मर्यादित आणि निश्चित असल्यामुळे इथे प्रत्येक एका मताची किंमत आणि त्यासाठी लावली जाणारी 'फिल्डिंग' खूप मोठी असते. गेल्या काही दिवसांत मतदारांना फुटण्यापासून रोखण्यासाठी आणि आपल्या बाजूने वळवण्यासाठी विविध अलिशान रिसॉर्ट्सवर सुरक्षित ठेवण्याचे 'रिसॉर्ट पॉलिटिक्स' नांदेडने अगदी जवळून अनुभवले आहे. मात्र, हे मतदान 'गुप्त' पद्धतीने होत असल्यामुळे राजकीय पक्षांनी कितीही बडदास्त ठेवली किंवा अधिकृत पक्षादेश (व्हिप) काढला, तरी छुप्या बंडाळीची आणि क्रॉस व्होटिंगची टांगती तलवार सर्वच राजकीय छावण्यांवर शेवटच्या मिनिटापर्यंत कायम आहे. काँग्रेस आणि मविआने जरी उमेदवाराच्या बाजूने मतदानाचा पक्षादेश काढला असला, तरी आष्टीकरांच्या बंडखोरीनंतर प्रत्यक्षात किती मते कुणाच्या पारड्यात पडणार, यावरच भाजपचे अमरनाथ राजूरकर विरुद्ध कृष्णा आष्टीकर यांच्यातील अटीतटीच्या लढतीचा निकाल ठरणार आहे.

नांदेडमधील स्थानिक लोकप्रतिनिधींपैकी अनेकांच्या राजकीय निष्ठा गेल्या दोन-तीन वर्षांतील पक्षांतरांच्या मालिकांमुळे आधीच ढळल्या आहेत. त्यामुळे कागदावर एका पक्षात असलेले लोकप्रतिनिधी प्रत्यक्षात मतपेटीत कोणाचे नशीब लिहितात, यावरच विजयाचे संपूर्ण गणित अवलंबून आहे. महायुतीने हा महत्त्वाचा गड आपल्या ताब्यात घेण्यासाठी आणि विरोधकांना नामोहरम करण्यासाठी आपली संपूर्ण राजकीय प्रतिष्ठा पणाला लावली आहे. तर दुसरीकडे, महाविकास आघाडीत ऐन मतदानाच्या तोंडावर निर्माण झालेला हा अंतर्गत पेच सत्ताधाऱ्यांच्या थेट पथ्यावर पडणार की मतदारांमध्ये निष्ठा बदलणाऱ्या नेत्यांबद्दल नवा रोष निर्माण करणार, हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल. आज सायंकाळी मतपेट्या बंद झाल्यानंतर उमेदवारांचे भवितव्य सील होईल आणि आगामी २२ जून रोजी लागणारा निकाल केवळ एका नेत्याला आमदार करणार नाही, तर आगामी विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर नांदेड जिल्ह्याचा खरा 'पॉलिटिकल बॉस' कोण, यावर अंतिम शिक्कामोर्तब करेल.

# ‘ऑपरेशन टायगर’आणि ठाकरेंच्या शिवसेनेपुढील अस्तित्वाची लढाई

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या अस्थिरता, अनपेक्षित वळणे आणि राजकीय भूकंपांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाहीये. २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या ऐतिहासिक बंडानंतर शिवसेनेचे दोन तुकडे झाले आणि राज्याच्या सत्तेची सर्व समीकरणे पूर्णपणे बदलली. त्या घटनेला आता चार वर्षे उलटून गेली आहेत, तरीही महाराष्ट्रातील सत्ता संघर्षाची धग अद्याप शांत झालेली नाही. जून २०२६ च्या या कडक उन्हाळ्यात पुन्हा एकदा उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील ’शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)’ गटावर एक अत्यंत मोठे आणि गंभीर संकट ओढवले आहे. ‘ऑपरेशन टायगर’ या नावाने सध्या राजकीय वर्तुळात जी प्रचंड खळबळ उडाली आहे, ती पाहता ठाकरेंच्या शिवसेनेला लोकसभा पातळीवर आणखी एक मोठे खिंडार पडण्याची शक्यता आता दाट झाली आहे. हा संघर्ष केवळ सत्तेचा नसून ठाकरे गटासाठी आपल्या राजकीय अस्तित्वाची लढाई ठरत आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत सर्व प्रतिकूल परिस्थितीशी लढत ठाकरे गटाने महाराष्ट्रात उल्लेखनीय यश मिळवले होते आणि त्यांचे ९ खासदार निवडून आले होते. या यशामुळे ठाकरे गटाला पुन्हा उभारी मिळेल अशी आशा निर्माण झाली असतानाच, शिंदे गटाने त्यांना धक्का देण्याची रणनीती आखली आहे. शिंदे गटाचे नेते आणि खासदारांच्या दाव्यानुसार, ठाकरे गटाचे तब्बल ६ ते ७ खासदार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या थेट संपर्कात असून ते लवकरच अधिकृतपणे शिंदे गटात प्रवेश करणार आहेत. या पडद्यामागील हालचालींना ‘ऑपरेशन टायगर’ असे नाव देण्यात आले आहे. संसदेचे आगामी पावसाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वीच हे ऑपरेशन पूर्ण करून ठाकरे गटाला संसदेत खिळखिळे करण्याची शिंदे गटाची रणनीती आहे. पक्षांतर बंदी कायद्यानुसार होणारी अपात्रतेची कारवाई टाळण्यासाठी ठाकरे गटाच्या ९ पैकी किमान ६ खासदारांनी एकत्र येऊन वेगळा गट स्थापन करणे कायदेशीरदृष्ट्या आवश्यक आहे. सध्या राजकीय वर्तुळातून येत असलेल्या खळबळजनक माहितीनुसार, यवतमाळचे खा.संजय देशमुख यांच्यासह ६ खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे स्वतंत्र गट स्थापन करण्यासाठी अधिकृत पत्र दिल्याचे समजते. या एकाच बातमीने महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणात प्रचंड खळबळ उडवून दिली आहे. उद्धव ठाकरे आणि त्यांच्या उर्वरित सहकाऱ्यांसाठी हा अत्यंत मोठा आणि मानहानीकारक धक्का मानला जात आहे. २०२२ मध्ये जेव्हा पक्षातील बहुतांश आमदारांनी साथ सोडली, तेव्हा पक्ष संघटन आणि तळागाळातील सामान्य शिवसैनिक अजूनही आपल्या पाठीशी भक्कमपणे उभा असल्याचा दावा ठाकरेंकडून वारंवार केला जात होता. लोकसभेच्या विजयाने त्यांच्या या दाव्याला बळही दिले होते. परंतु, आता थेट जनतेतून निवडून आलेले लोकसभेतील खासदारच जर पक्ष सोडण्याच्या आणि बंड करण्याच्या तयारीत असतील, तर नेतृत्वाच्या विश्वासार्हतेवर, त्यांच्या निर्णयक्षमतेवर आणि एकूणच पक्षीय पकडीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होते. शिंदे गटाचे खा.नरेश म्हस्के यांनी ‘‘सरदार घरात बसणारा असेल तर सैन्य सोडून जाणारच’’ असा थेट टोला उद्धव ठाकरेंना लगावला आहे. हा टोला केवळ वैयक्तिक टीका नसून, उद्धव ठाकरेंच्या कार्यपद्धतीवर आणि त्यांच्या खासदारांशी असलेल्या संपर्काअभावावर करण्यात आलेला एक मोठा राजकीय हल्ला आहे.दुसरीकडे, या अनपेक्षित संकटाचा सामना करण्यासाठी ठाकरे गटानेही आपली पूर्ण ताकद पणाला लावली आहे. उद्धव ठाकरे यांनी तातडीने मातोश्रीवर सर्व उपलब्ध खासदारांची महत्त्वाची बैठक बोलावून त्यांना कडक ‘व्हिप’ जारी केला आहे. खा.संजय राऊत यांनी नेहमीच्या आक्रमक शैलीत या ‘ऑपरेशन टायगर’ ची खिल्ली उडवली आहे, ‘‘आम्ही या लांडग्यांच्या टोळीविरुद्ध ‘ऑपरेशन लांडगा’ राबवू. आमचे सर्व खासदार पूर्णपणे एकसंघ आहेत,’’ असा ठाम दावा त्यांनी केला आहे. या संघर्षात नाशिकचे खा.राजाभाऊ वाजे यांच्यासारख्या काही निष्ठावान खासदारांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. त्यांनी शिंदे गटाकडून आलेली १०० कोटींची आणि कर्जमुक्तीची कथित ऑफर जाहीरपणे धुडकावून लावत ठाकरेंशी असलेली आपली भक्कम निष्ठा सिद्ध केली आहे. यावरून हे स्पष्ट होते की, महाराष्ट्रातील हा खेळ आता केवळ राजकीय आकड्यांचा राहिलेला नाही, तर तो ‘निष्ठा विरुद्ध प्रलोभने’ असा एक उघड आणि अत्यंत तीव्र संघर्ष बनला आहे. विरोधी पक्षांनी या संपूर्ण प्रकरणाला ‘ऑपरेशन बाजार’ असे नाव दिले आहे, कारण यामध्ये राजकीय विचारधारेपेक्षा पैशांचा आणि सत्तेचा प्रभाव अधिक स्पष्टपणे अधोरेखित होत आहे. राजकीय दृष्टिकोनातून या घडामोडींचे दूरगामी परिणाम होणार आहेत. एकनाथ शिंदे यांचा हा डाव जर पूर्णपणे यशस्वी ठरला, तर निवडणूक आयोग आणि न्यायालयानंतर आता संसदेतही ‘खरी शिवसेना’ कोणती, या त्यांच्या दाव्यावर आणखी एक भक्कम कायदेशीर आणि राजकीय मोहोर उमटेल. तसेच, राष्ट्रीय पातळीवर एनडीए आघाडीची ताकद वाढवण्यासाठी भाजप आणि शिंदे गटाचा हा एक खूप मोठा मास्टरस्ट्रोक मानला जाईल. विशेष म्हणजे, सध्या देशात एकाच वेळी दोन मोठ्या राज्यांमध्ये अशा हालचाली सुरू आहेत. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसमध्येही आमदारांच्या अंतर्गत बंडाची मोठी चर्चा सुरू असतानाच, महाराष्ट्रातील हे ‘ऑपरेशन टायगर’ समोर आले आहे. त्यामुळे विरोधकांच्या राष्ट्रीय पातळीवरील ‘इंडिया’ आघाडीसाठी हा सलग दुसरा मोठा आणि अनपेक्षित धक्का ठरू शकतो. राजकारणात कुणीही कायमचा मित्र किंवा शत्रू नसतो, असे नेहमी म्हटले जाते; पण सध्या महाराष्ट्रात घडणाऱ्या या सर्व घडामोडी पाहता, ‘राजकारणात कोणतीही निष्ठा आणि तत्त्वे कायमस्वरूपी नसतात’ हाच नवा धडा राज्यातील जनतेला वारंवार मिळत आहे. आजकालचे राजकारण हे लोककल्याण, विशिष्ट विचारसरणी किंवा धोरणांवर न चालता केवळ सत्ता टिकवणे आणि सत्तेतून मिळणाऱ्या तात्पुरत्या फायद्यांवर केंद्रित झाले आहे. शिवसेनेसारख्या एकेकाळी ‘कट्टर निष्ठावंतांचा आणि आक्रमक कार्यकर्त्यांचा पक्ष’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संघटनेत अशी वारंवार पडणारी फूट हे याच बदलत्या, सोयीस्कर आणि संधीसाधू राजकीय संस्कृतीचे मोठे द्योतक आहे.शेवटी सर्वात मोठा आणि कळीचा प्रश्न उरतो तो उद्धव ठाकरे यांच्या राजकीय भविष्याचा आणि अस्तित्वाचा. जर हे खासदार खरोखरच शिंदे गटात सामील झाले, तर ठाकरे गटाला पुन्हा एकदा शून्यातून नवीन विश्व निर्माण करावे लागेल. संसदेच्या पावसाळी अधिवेशनापूर्वी या संपूर्ण राजकारणाचे चित्र पूर्णपणे स्पष्ट होईलच. परंतु, या अत्यंत खालच्या पातळीवर गेलेल्या सत्तानाट्यात महाराष्ट्रातील सामान्य मतदार मात्र पुन्हा एकदा पूर्णपणे बुचकळ्यात पडला आहे. ज्या लोकप्रतिनिधींना आपण मोठ्या विश्वासाने आणि आशेने मतदान करून निवडून दिले, ते उद्या सकाळी नेमक्या कोणत्या पक्षाच्या झेंड्याखाली उभे असतील याची कोणतीही शाश्वती आता उरलेली नाही. ‘ऑपरेशन टायगर’ यशस्वी होणार की, ठाकरे गट आपले अस्तित्व प्राणपणाने टिकवून ठेवण्यात यशस्वी होणार, यावरच महाराष्ट्राच्या भविष्यातील राजकारणाची पुढची दिशा आणि दशा ठरणार आहे.

## विधान परिषद सदस्य;राज्यातील जनतेवर लादलेले ओझे

**रमेश लांजेवार**
नागपूर.

कुणाचे ओझे कुणाच्या खांद्यावरी अशी परिस्थिती राजकीय वर्तुळात दिसून येते.सध्या राज्यात विधान परिषदेच्या निवडणुकीची घोडदौड जोरात सुरू आहे. उमेदवार निवडणूक यावे यासाठी घोडेबाजार सुध्दा सुरू आहे ज्या-ज्या सदस्यांना मतदानाचा अधिकार आहे अशा सर्व नगरसेवकांना अज्ञात स्थळी किंवा ठराविक ठिकाणी पाठविण्यात आले आहे जेणेकरून मतदारांमध्ये फुट पडु नये ही कसली लोकशाही किंव्हा निवडणूक म्हणावी!.यावरून स्पष्ट होते की विधानपरिषदेच्या निवडणुका राज्याच्या जनतेवर लादलेला मोठा भार आहे. देशात २८ राज्ये व ८ केंद्र शासित प्रदेश आहेत.यात फक्त ६ राज्यात विधान परिषद सदस्य आहेत. त्यामुळे याठिकाणी विधान परिषद दिसून येते.यामुळे या सहा राज्यांचे राजकीय पुढाऱ्यांचे ओझे सर्व सामान्यांनवर त्या-त्या राज्यांनी लादल्याचे निदर्शनास येते.त्यामुळे या ६ राज्यातील विधानपरिषद पुर्णतः बरखास्त करायला हवी. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, बिहार, उत्तरप्रदेश याच राज्यात विधानपरिषद सदस्य का?असा प्रश्न सर्वसामान्यांना नेहमी भेडसावत असतो. त्यामुळे विधानपरिषद सदस्य ही सुरू असलेली ६ राज्यातील परंपरा केंद्र सरकारने ताबडतोब संपुष्टात आणली पाहिजे.

विधानसभेसाठी वेगळे सभागृह हे राज्यावर व राज्याच्या जनतेवर लादलेले जास्तीचे ओझे नाही का? यामुळे राज्याच्या विकासात आर्थिक अडचण निर्माण होत नाही का?कारण विधानपरिषद म्हणजे राज्याच्या दृष्टीकोनातुन जनतेवर लादलेले मोठे ओझेच म्हणावे लागेल.महाराष्ट्रात तब्बल ७८ विधानपरिषद सदस्य असतात.यांना पगार, पेंशन, इतर भत्ते किंवा इतर खर्च यात राज्याचे दर




महिन्याला करोडो रुपये पाण्यात जात आहे.कारण राज्याचा कारभार पहाण्यासाठी राज्याच्या जनतेने निवडून दिलेले २८८ सदस्य व ४८ खासदार असतांना विधानपरिषद सदस्य कशाला? कारण विधानपरिषद सदस्य निवडून आल्यानंतर लुप्त होतात कारण त्यांच्याकडे कोणतेच काम नसते फक्त सरकारी सुविधांचा भरपूर फायदा घेतात. राज्याच्या विकासासाठी शहरापासून तर गावखेड्यापर्यंत ग्रामपंचायत, महानगरपालिका, जिल्हा परिषद इत्यादी अनेक क्षेत्रातील सदस्य व सरकारी यंत्रणा सुसज्जीत असते आणि आपआपल्या क्षेत्रात कार्यरत असतात.यांच्या मदतीला राज्याचे २८८ विधानसभा सदस्य (आमदार) व ४८ लोकसभा सदस्य (खासदार) असतात. येवढामोठा राजकीय फौजफाटा असतांना ७८ विधानपरिषद सदस्यची (आमदारांची) आवश्यकता का? राज्याची १२ कोटी ९४ लाख जनता विधानसभा सदस्य व खासदार यांचे कार्य व महत्त्व चांगल्या प्रकारे समजु शकतात. परंतु विधानपरिषद सदस्यांची आवश्यकता नसतांना त्यांना लोकप्रतिनिधीचा मान देने उचीत नसल्याचे मला वाटते. कारण राज्याच्या १२ कोटी ९४ लोकांनी आपल्या उघड्या डोळ्यांनी पहावे की विधानपरिषद निवडणुकीत घोडेबाजार मोठ्या प्रमाणात होतांना दिसतो. माझ्यामते राज्याच्या विकासासाठी राज्याचे २८८ आमदार व ४८ खासदार समर्थ आहेत आणि हेच खरे लोकप्रतिनिधी आणि जनप्रतिनिधी आहेत. त्यामुळे ज्या ज्या राज्यात विधानपरिषदा आहेत तेथील विधानपरिषद पुर्णतः बरखास्त करून राज्याचा कारभार फक्त लोकांमधुन निवडणूक गेलेल्या लोकप्रतिनिधींनाच असायला हवा. देशातील २२ राज्य बिना विधानपरिषदेने राज्यकारभार पाहू शकतात, चालवु शकतात व विकास करू शकतात मग महाराष्ट्रासह देशातील उत्तरप्रदेश, तेलंगणा, बिहार, आंध्रप्रदेश, कर्नाटक हे ६ राज्य जनतेच्या लोकप्रतिनिधी कडुन का चालवु शकत नाही? देशातील २८ राज्यांपैकी फक्त ६ राज्यात विधानपरिषद अस्तित्वात आहे हे आश्चर्यच म्हणावे लागेल. विधानपरिष जर पाहिजे होती तर सर्वच राज्यांमध्ये हवी होती. त्यामुळे देशातील ६ राज्यातील विधानपरिषदेचा होणारा संपूर्ण खर्च अवाजवी असल्याचे स्पष्ट दिसून येते.त्यामुळे केंद्र सरकारला आग्रह करतो की देशातील समान हक्क समान कायदा अंतर्गत ६ राज्यातील विधानपरिषद पध्दती ताबडतोब बरखास्त करावी व राज्याची संपूर्ण धुरा लोकप्रतिनिधी आणि जनप्रतिनिधी यांच्या स्वाधीन करावी. तेव्हाच देशातील २८ राज्यात समानता दिसून येईल.जम्मु काश्मीर या राज्यात विधानपरिषद कार्यरत होती. परंतु घटनेच्या ३७० व्या कलमानुसार असलेले विशेषाधिकार रद्द करण्यात आले आणि राज्याला केंद्रशासित दर्जा बहाल करण्यात आला. यानंतर जम्मू काश्मीरमधील विधानपरिषदेचे अस्तित्व संपुष्टात आले.देशात पश्चिम बंगाल, पंजाब, तामिळनाडू, जम्मू काश्मीर या राज्यात विधानपरिषद होती. परंतु याची गरज नसल्याचे लक्षात आल्याने कालांतराने विधानपरिषद बरखास्त करण्यात आली. यात पश्चिम बंगाल (१९६९), पंजाब (१९७०), तामिळनाडू (१९६८), जम्मू काश्मीर (२०१९) येथील विधानपरिषद बरखास्त करण्यात आली. आसाम राज्यात स्वातंत्र्यापूर्वी विधानपरिषद होती. परंतु स्वतंत्र मिळाल्यानंतर (१९४७) ला ती बरखास्त करण्यात आली. महाराष्ट्रात विधानपरिषद जुलै १९३७ मध्ये अस्तित्वात आली. परंतु देश स्वतंत्र झाल्यानंतर व महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतरही विधानपरिषद कधीच बरखास्त झाली नाही किंव्हा तसा ठरावही विधानसभेत करण्यात आलेला नाही.परंतु आज महाराष्ट्रातील विधानपरिषदेला स्थापन होऊन ८९ वर्षे होत आहे तरी तीला बरखास्त केले नाही हे आश्चर्यच म्हणावे लागेल. सध्या राज्याला विधानपरिषदेची मुळातच गरज नाही असे मला वाटते. महाराष्ट्रातीलच नाही तर देशातील ६ राज्यातील संपूर्ण विधानपरिषद बरखास्त करण्याची वेळ आलेली आहे. १/३ सदस्य विधानसभेच्या सदस्यांकडून,१/३ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांकडून, १/१२ शिक्षक मतदार संघातून,१/१२ सदस्य पदवीधर मतदार संघातून, १/६ सदस्य राज्यपालांकडून अशा पध्दतीने विधानपरिषद सदस्यांची निवड केली जाते. अशाप्रकारे एकुण ७८ सदस्यांची निवड विधान परिषदेसाठी करण्यात येते.माझ्या माहिती नुसार राज्याला विधानपरिषदेची मुळातच आवश्यकता नाही.राज्यात विधानपरिषदेची मुळातच आवश्यकता नसल्याने राज्य सरकारने विधानपरिषद बरखास्त करण्याचा निर्णय घ्यावा व तसा प्रस्ताव केंद्राकडे पाठवावा. कारण घटनेतील कलम१६९ व्या तरतूदीनुसार विधानपरिषद बरखास्त करण्याकरिता संसदेची मान्यता आवश्यक असते. त्यामुळे राज्य सरकारने विधानपरिषद बरखास्तीचा प्रस्ताव ताबडतोब केंद्राकडे पाठवायला हवा व विधानपरिषद संपुष्टात आणायला हवी. असे जर झाले राज्यात जास्तीचा होणारा खर्च वाचेल व राज्याच्या विकासाला हातभार लागेल.

## धोंडे जेवणाच्या कार्यक्रमातून नारी शक्तीचा भव्य सन्मान

### आ.राजेश पवार व पूनमताई पवार यांचा स्तुत्य उपक्रम;हजारो महिलांचा उत्स्फूर्त सहभाग



नायगाव/प्रतिनिधी- अधिक मासानिमित्त धोंड महिन्याचे औचित्य साधत नायगाव येथील कुसुम लॉन्समध्ये दि.१५ व १६ जून रोजी भव्य धोंड जेवण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.नायगाव विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आ.राजेश पवार व माजी जिल्हा परिषद सदस्या पूनमताई पवार यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात नारी शक्तीचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी उमरी, धर्माबाद व नायगाव तालुक्यातील आशा वर्कर, मदतनीस, सुपरवायझर, अंगणवाडी सेविका तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक व सेवाक्षेत्रात कार्यरत हजारो महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. व्यासपीठावर पाच महिलांचे औक्षण करून त्यांना साडी-चोळीचा आहेर देण्यात आला. त्यानंतर उपस्थित सर्व महिलांचे त्यांच्या जागेवर जाऊन पारंपरिक पद्धतीने औक्षण करण्यात आले. दुसऱ्या दिवशी भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व त्यांच्या कुटुंबीयांसाठी धोंड जेवणाचे आयोजन करण्यात आले. दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात आमदार राजेश पवार व पूनमताई पवार हे पूर्णवेळ उपस्थित राहून प्रत्येक पाहुण्याची आत्मीयतेने विचारपूस करत होते. त्यांच्या साधेपणा, आपुलकी आणि लोकाभिमुख कार्यशैलीचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. यावेळी बोलताना आमदार राजेश पवार म्हणाले की, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करणे ही भारतीय संस्कृतीची गौरवशाली परंपरा असून नारी शक्तीचा सन्मान करण्याचे सौभाग्य लाभणे हे आपले भाग्य आहे. महिला सक्षमीकरण, सांस्कृतिक परंपरांचे जतन आणि सामाजिक ऐक्य वृद्धिंगत करण्यासाठी अशा उपक्रमांचे विशेष महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. मतदारसंघातील महिलांना प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या कार्याचा सन्मान व्हावा या उद्देशाने आमदार राजेश पवार व पूनमताई पवार यांच्या वतीने दरवर्षी हळदी-कुंकू, डब्बा पार्टी, धोंड जेवण तसेच विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्यांच्या या लोकाभिमुख उपक्रमांना महिलांकडून मोठा प्रतिसाद मिळत असून जनसामान्यांमध्ये त्यांच्याविषयी विशेष आपुलकी निर्माण झाली आहे. कार्यक्रमात पूनमताई पवार, सीडीपीओ शिवशेट्टे, मनोहर पवार, बाबासाहेब हंबर्डे, बालाजी मदेवाड, श्रीहरी देशमुख नरंगलकर, दत्ता पाटील ढगे, प्रकाश पाटील हेंडगे, रंजित पाटील कुरे, सोपान पाटील कदम, प्रतिभाताई धानोरकर, पलविताई वडजे, जयश्रीताई नरवाडे, गणेश कँदुरके, अवकाश धुपेकर, रामेश्वर जाधव, नागेश काळेकर, मारोती घंटेवाड, माधव चितले, राजू फते यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# ‘खा.आष्टीकरांमुळे राजकीय गणित बदलणार ;हदगावमध्ये चर्चांना उधाण’

हदगाव/प्रतिनिधी-हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खा.नागेश पाटील आष्टीकर हे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेला धक्का देत उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करणार असल्याने स्थानिय राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. त्यांच्या या अचानक झालेल्या राजकीय निर्णयामुळे हिंगोली लोकसभा मतदारसंघासह विशेषत: हदगाव विधानसभा क्षेत्रात विविध राजकीय चर्चा रंगू लागल्या असून दोन्ही गटाच्या शिवसैनिकांमध्ये आश्चर्य, नाराजी आणि अपेक्षा अशा संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

विशेष म्हणजे आष्टीकर परिवारची अनेकवर्षा पासून शिवसेना ठाकरे परिवाराशी राजकीय नाळ जोडलेली मानली जात होती. त्यामुळे खा. नागेश पाटील आष्टीकर शिंदे गटात प्रवेश करतील, अशी शक्यता अनेकांना वाटत नव्हती. त्यांच्या या निर्णयामुळे स्थानिक शिवसैनिक आणि समर्थकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.या राजकीय घडामोडी बाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी शिवसेना (शिंदे गट) नांदेड जिल्हा प्रमुख विवेक देशमुख यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सावध भूमिका घेतली. हा निर्णय पक्षाच्या वरिष्ठ पातळीवर झालेला आहे. त्यामुळे त्यावर प्रतिक्रिया देणे आमच्या सारख्या पदाधिकाऱ्यांसाठी योग्य ठरणार नाही. मात्र स्थानिक पातळीवर आम्ही सातत्याने संघर्ष करून शिवसेना पक्ष मजबूत केला हे मात्र ते सांगायला विसरले नाहीत. खा.आष्टीकर यांच्या आगमनामुळे पक्षाला बळ मिळेल आणि संघटना अधिक मजबूत होईल अशी अपेक्षा आहे, असे ते म्हणाले. दरम्यान, हदगाव विधानसभाक्षेत्राचे आ. बाबुराव कदम कोहळीकर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात



आला. मात्र त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. खा.आष्टीकर यांच्या निर्णयाबाबत त्यांच्या समर्थकांमध्ये ही वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत आहेत. आम्ही त्यांच्या माजी आमदार वडिलांच्या काळापासून आष्टीकर परिवाराच्या तिसऱ्या पीडीपर्यंत साथ देत आलो आहोत. ते असा अचानक निर्णय घेतील, असे वाटले नव्हते, अशी भावना काही जुन्या समर्थकांनी व्यक्त केली. तर काहींकडून या निर्णयामागे विकासाचे राजकारण असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.काही नागरिकांच्या मते, सत्ताधारी पक्षात गेल्यामुळे हिंगोली लोकसभा मतदारसंघ आणि हदगाव विधानसभा क्षेत्राच्या विकासाला अधिक निधी मिळू शकतो. भविष्यात या भागाला मंत्रिपदाची संधी निर्माण झाल्यास विकास कामांना गती मिळू शकते. त्यामुळे आष्टीकर यांनी व्यापक विकासाच्या दृष्टीने हा निर्णय घेतला असावा, असे मतही व्यक्त केले जात आहे.मात्र दुसरीकडे, हदगाव विधानसभा क्षेत्रातील विद्यमान आमदारांच्या राजकीय समीकरणांवर या निर्णयाचा काय परिणाम होणार, याबाबत उत्सुकता वाढली आहे. स्थानिक पातळीवर आधीपासून सक्रिय असलेल्या शिवसेना शिंदे गटातील नेते व कार्यकर्त्यांमध्ये नव्या नेतृत्वाच्या आगमनामुळे राजकीय समतोल बदलणार का, याची चर्चा सुरू झाली आहे. अवघड जागी दुखणे तर होणार नाही ना? असा प्रश्न काही शिवसैनिकांमध्ये उपस्थित होताना दिसत आहे.आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच पुढील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खा. नागेश पाटील आष्टीकर यांचा हा निर्णय हिंगोली लोकसभा आणि हदगाव विधानसभा मतदारसंघातील राजकीय समीकरणे बदलणारा ठरू शकतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. आता त्यांच्या या निर्णयामुळे संघटनात्मक ताकद वाढते की, स्थानिक स्तरावर नवीन वाद निर्माण होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




नांदेड स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत महापौर कविता मुळे यांच्यासह भाजपच्या नगरसेविका यांनी मतदान केंद्रावर जावून मतदानाचा हक्क बजावला आहे. यावेळी स्थायी समितीचे माजी सभापती अमितसिंह तेहरा दिसत आहेत.

# माहिती अधिकार संरक्षण समितीच्या प्रदेश उपाध्यक्षपदी शब्बीर शेख

देगलूर/प्रतिनिधी-अन्याय, भ्रष्टाचार आणि प्रशासकीय दिरंगाई विरोधात निर्भीडपणे लढा देणारे ज्येष्ठ पत्रकार शब्बीर शेख यांची माहिती अधिकार संरक्षण समितीच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

दि.१६ जून रोजी नांदेड येथील समितीच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शेख जाकेर शेख सगीर, प्रदेशाध्यक्ष प्रवीण कानघुले तथा प्रदेश कार्याध्यक्ष सुनील कांबळे यांच्या हस्ते शब्बीर शेख यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. पत्रकारितेच्या माध्यमातून शब्बीर शेख यांनी सामाजिक, शैक्षणिक व प्रशासकीय प्रश्नांवर सातत्याने प्रकाश टाकत सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या निर्भीड आणि जनहितवादी भूमिकेची दखल घेत समितीने त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे. त्यांच्या नियुक्तीचे सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व विविध संघटनांनी स्वागत केले आहे.



# विमा पाठपुराव्याला यश;आ.राजेश पवार यांच्या प्रयत्नांमुळे शेतकऱ्यांना दिलासा

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव विधानसभा मतदारसंघातील काही मंडळांना पीक विमा मंजूर न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण होते. या पार्श्वभूमीवर आ.राजेश पवार यांनी संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करून शेतकऱ्यांच्या प्रश्नाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश आले असून अनेक मंडळांतील शेतकऱ्यांना पीक विमा मंजूर करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, नायगाव तालुक्यातील नरसी, घुंगराळा व बरबडा मंडळ, धर्माबाद तालुक्यातील धर्माबाद, करखेली व सिराजखोड मंडळ तसेच उमरी तालुक्यातील सिंधी मंडळातील शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे संबंधित भागातील शेतकरी बांधवांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. आधीच काही मंडळांतील शेतकऱ्यांना विमा मंजूर झाला होता. उर्वरित मंडळांनाही न्याय मिळावा यासाठी आ. राजेश पवार यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे हा प्रश्न मार्गी लागल्याचे सांगण्यात येत आहे. या निर्णयामुळे शेतकरी बांधवांमध्ये समाधानाचे वातावरण असून त्यांनी आ. राजेश पवार, राज्य शासन, कृषी विभाग व संबंधित प्रशासनाचे आभार व्यक्त केले आहेत. शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या आ.राजेश पवार यांच्या कार्याची परिसरात प्रशंसा होत आहे.

# नीट परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

नांदेड/प्रतिनिधी-नीट-युजी-२०२६ फेर प्रवेश परीक्षा रविवार २१ जून रोजी दुपारी २ ते ५ या कालावधीत जिल्ह्यातील विविध ४२ परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. या केंद्रापासून ५०० मिटरच्या परिसरात २१ जून रोजी सकाळी ८ ते सायं ७ वाजेपर्यंतच्या कालावधीत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी या व्यक्तीरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी याबाबतचा आदेश १७ जून रोजी निर्गमीत केला आहे. या परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी याव्यतिरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅलक्युलेटर, ट्रॅन्झीस्टर, रेडिओ, लॅपटॉप आदी तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या ५०० मिटर पर्यंत परिसरात वापरण्यास व जवळ बाळगण्यास, परीक्षा केंद्रात नेण्यास त्याचप्रमाणे दर्शविलेल्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरातील ५०० मीटर पर्यंतची सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एस. टी.डी., आय.एस.डी., भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनिक्षेपक चालू ठेवण्यास याद्वारे प्रतिबंध करण्यात आले आहे.

# शिवसेना कार्यकर्त्यावर प्राणघातक हल्ला

उमरखेड/प्रतिनिधी-उमरखेड शहरातील शिवसेना (शिंदे गट) कार्यकर्ते व छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा कृती समितीचे उपाध्यक्ष रमेश गुलाबसिंग चव्हाण यांच्यावर तीन अज्ञात युवकांनी प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना मंगळवार (दि.१६) रोजी सायंकाळी घडली. चाकू व लोखंडी रॉडच्या सहाय्याने केलेल्या या हल्ल्यात चव्हाण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले आहे.

स्थानिक हनुमान वार्डात राहणारे रमेश चव्हाण हे शिवसेना (शिंदे गट) चे सक्रिय कार्यकर्ते असून ते विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सुद्धा नेहमी सहभाग घेत असत. घटनेच्या दिवशी ते काही कामानिमित्त उमरखेड पोलीस स्टेशन मध्ये जाऊन आले होते. त्यानंतर मंगळवारी दिवसभराची विविध कामे आटोपून सायंकाळी ६ च्या सुमारास ते दुचाकीने परत घरी निघाले असताना तोंड बांधलेले तीन युवक त्यांचा पाठलाग करीत असल्याचा संशय चव्हाण यांना आला. पुढे जाऊन न.प. मुख्याधिकाऱ्यांच्या शासकीय बंगल्याजवळ पोहोचताच त्या तिघांनी त्यांच्या दुचाकीसमोर मोटारसायकल आडवी लावून त्यांना अडविले. आणि दुचाकीवरून उतरून शिवीगाळ करत चव्हाण यांच्या गळ्यावर चाकू लावून हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनी प्रतिकार केल्याने मोठी दुर्घटना टळली. त्याचवेळी उर्वरित दोघांनी लोखंडी रॉडने त्यांच्या पायांवर वार करण्यास सुरुवात केली. हल्लेखोरांनी काही अंतरापर्यंत पाठलाग करत लोखंडी रॉडने मारहाण केली. मात्र चव्हाण यांनी मोठ्याने मदतीसाठी हाक मारल्यानंतर तिघेही घटनास्थळावरून फरार झाले. या हल्ल्यात त्यांच्या दोन्ही पायांना दुखापत झाली आहे. चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून, उमरखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

# भोकर नगर परिषदेचे नगरसेवक गेले गोव्याच्या सहलीवर

भोकर/प्रतिनिधी-येथील नगर परिषदेचे नगरसेवक व त्यांचे प्रतिनिधी गोव्याच्या सहलीचा आनंद घेण्यासाठी मौज मजा करण्यासाठी सर्व मिळून सहलीला गेले असून शहरातील अनेक समस्या बाजूला ठेवून नगरसेवक आनंदाने मजा घेत आहेत.

पावसाळा तोंडावर आलेला असताना शहरात अनेक समस्या आहेत. रस्त्यांची अवस्था, तुंबलेल्या नाल्या, रस्त्यामध्ये साचणारे घाण पाणी, पावसाच्या पाण्यामुळे होणारा त्रास अशा अनेक समस्या असताना सुद्धा भोकर नगर परिषदेचे नगरसेवक व त्यांचे प्रतिनिधी गोव्याच्या सहलीला जाऊन आनंद लुटत आहेत. शहरातील समस्या बाबत मात्र त्यांना काहीही चिंता वाटत नाही फक्त सहलीचा आनंद लुटण्यासाठी ते मौज मजा करीत आहेत. आपल्या वॉर्डाचा विकास व्हावा आपल्या वार्डातील समस्या दूर व्हाव्या यासाठी नागरिकांनी नगरसेवकांना निवडून दिले आहे मात्र विधान परिषद निवडणुकीचे मतदान १८ जून रोजी होणार असल्याने नगरसेवकांची चांदीच झाली मतदानासाठी सुरक्षेची बाब म्हणून येथील सर्व नगरसेवक त्यांचे प्रतिनिधी यांना गोव्याच्या सहलीवर पाठविण्यात आलेले आहे तिथे वेगवेगळ्या गोष्टींची ते मजा घेत आहेत गोव्याची सहल म्हणजे सर्वांना सर्वश्रुत आहे समुद्राचा किनारा, तिथे खाण्यापिण्यासाठी मिळणारे वेगवेगळे पदार्थ, निवासाची उत्तम व्यवस्था, पाहण्यासाठी वेगवेगळ्या लोकांचे चित्रप्रदर्शन व अन्य काही बाबींची मजा घेताना नगरसेवक मात्र गोव्याच्या सहलीवर आनंदी आहेत समाज माध्यमावर नगरसेवकांच्या सहलीबाबत संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

# सायन्स कॉलेजच्या विद्यार्थिनीची प्रतिष्ठित समर रिसर्च फेलोशिपसाठी निवड

नांदेड/प्रतिनिधी-येथील सायन्स कॉलेजच्या भौतिकशास्त्र विभागातील बी.एस्सी. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी कु कांचन रत्नपारखे हिची इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेस, इंडियन नॅशनल सायन्स अकॅडमी आणि द नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेस, इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रतिष्ठित समर रिसर्च फेलोशिप प्रोग्रामसाठी निवड झाली आहे.

या फेलोशिप अंतर्गत ती हरीश-चंद्र रिसर्च इन्स्टिट्यूट, प्रयागराज येथे प्रा.अदिती सेन दे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन महिन्यांचे संशोधन कार्य करणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. लक्ष्मण शिंदे यांचे विद्यार्थ्यांना संशोधन क्षेत्रात पुढे जाण्यासाठी मिळणारे सातत्यपूर्ण प्रोत्साहन या यशामागे मोलाचे ठरले आहे. या यशाबद्दल महाविद्यालयातर्फे कु. कांचन रत्नपारखे व तिच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य प्रा.डॉ.लक्ष्मण शिंदे, डॉ.डी.एम. जाधव, डॉ.विशाल मराठे, डॉ. अश्विन बोरीकर, डॉ.किरण शिल्लेवार, डॉ.उल्हास पत्की, डॉ. विजयकिरण नरवाडे, सुनील कदम व राहुल गवारे उपस्थित होते. तिच्या या यशाबद्दल नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए. डॉ. प्रवीण पाटील, उपाध्यक्ष ॲड. प्रफुल अग्रवाल, सचिव सौ. श्यामल पत्की व सहसचिव ॲड.प्रदीप नागापूरकर, प्राचार्य डॉ.लक्ष्मण शिंदे, उपप्राचार्या डॉ.अरुणा शुक्ला, उपप्राचार्य प्रा. एकनाथ खिल्लारे, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख प्रा.अविनाश घाडगे, प्रा. श्रीकांत दुलेवाड, डॉ.विजयकिरण नरवाडे, प्रा. रोहित गावित यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



CHANGE IN NAME

My (old name) is **MOHD SHAKEEL AHMED MD VAZIR AHMED** which now I am, changing as (new name) **MOHAMMAD SHAKEEL AHMED MOHAMMAD VAZEER AHMED**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**MOHAMMAD SHAKEEL AHMED**
**MOHAMMAD VAZEER AHMED**
R/o H,no.1-4-95,galli no.4 near floor mill
Maqdoom nagar Nanded-431602
M.No.-9423626541

# सोयाबीनसोबत तूर आंतरपीक पद्धतीचा अवलंब करण्याचे आवाहन

नांदेड/प्रतिनिधी-सध्याच्या हवामानातील अनिश्चितता व यावर्षी एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे पावसाचे असमान वितरण, खंडित पाऊस अथवा दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी जोखीम कमी करण्यासाठी व उत्पादनाची शाश्वती वाढविण्यासाठी सोयाबीन + तूर आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.

आंतरपीक पद्धती ही हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर एक प्रभावी जोखीम व्यवस्थापन तंत्र आहे. सोयाबीन व तूर या पिकांची वाढ, अन्नद्रव्यांची गरज व कालावधी वेगवेगळा असल्याने दोन्ही पिके एकत्र घेतल्यास उपलब्ध पाणी, सूर्यप्रकाश व जमिनीतील अन्नद्रव्यांचा अधिक कार्यक्षम वापर होतो. नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, पावसातील खंड किंवा इतर प्रतिकूल हवामानामुळे एका पिकाचे नुकसान झाल्यास दुसऱ्या पिकापासून उत्पादन मिळण्याची शक्यता राहते. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान कमी होऊन त्यांच्या हातात काही ना काही उत्पादन निश्चितपणे येण्यास मदत होते. ही पद्धत शेती व्यवसाय अधिक सुरक्षित व शाश्वत बनविण्यास उपयुक्त ठरते.सोयाबीन व तूर आंतरपीक पद्धतीमध्ये शिफारशीनुसार ४:२ किंवा ६:२ ओळींचे प्रमाण ठेवावे. तसेच सुधारित वाणांची निवड, संतुलित खत व्यवस्थापन, वेळेवर तण नियंत्रण व एकात्मिक कीड व्यवस्थापनाचा अवलंब करावा.हवामानातील अनिश्चितता लक्षात घेऊन पीक विविधीकरणास प्राधान्य द्यावे.

# जुगार अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-मुखेड तालुक्यातील खरब खंडगाव येथे सूतगिरीच्या पाठीमागे मोकळ्या जागेत सुरु असलेल्या जुगार अड्यावर मुखेड पोलिसांनी धाड टाकून ५ लाख ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस उपनिरीक्षक अभिजीत गणेश तुत्तुरवाड यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरुन १६ जून रोजी सायं.६ वाजून १० मिनिटांनी ही कारवाई करण्यात आली. आरोपी दाजीराव कदम, नरसिंग गायकवाड, माधव बेंद्रे, शेख शब्बीर, नबी हैदरसाब, बालेसाहेब शेख हे गोलाकाररित्या बसून पैशावर जुगार खेळत होते. पोलिसांनी घटनास्थळावरुन १३ हजार रुपये रोख व ५ लाख ३० हजार रुपये किंमतीच्या ८ मोटारसायकली असा एकूण ५ लाख ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी मुखेड पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या पतीचा खून



नांदेड/प्रतिनिधी- अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या पतीचा दगडाने ठेचून खून करुन प्रेत शेतात पुरल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी मरखेल पोलीसांनी पत्नी व तीच्या प्रियकरास अटक केली.

आमदापूर ता.देगलूर येथील रामकिशन गंगाधर गोलेवार हे दि.२५ एप्रिल २०२६ पासून बेपत्ता होते. गोलेवार हे बेपत्ता झाल्याची माहिती त्यांच्या पत्नी दैवशाला रामकिशन गोलेवार हिने २५ दिवसानंतर मरखेल पोलीस स्टेशनला दिली होती. मरखेल पोलीस ठाण्यात मिसिंगची कारवाई करण्यात आली. मरखेल पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरिक्षक रवी हुंडेकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी रामकिशन गोलेवार हे बेपत्ता झाल्याने त्यांचा शोध सुरु केला होता. तेंव्हा त्यांना अनेक संशयास्पद बाबी आढळून आल्या. तसेच गावातही या संदर्भात चौकशी केली असता रामकिशन गोलेवार यांची पत्नी दैवशाला गोलेवार हिचे गावातील सुभाष यतरवाड याच्यासोबत अनैतिक संबंध असल्याची माहिती समजली. त्यानंतर पोलीसांनी आणखी खोलपर्यंत तपास सुरु केला. रामकिशन गोलेवार यास आपल्या पत्नीचे सुभाष यत्तरवाड याच्यासोबत अनैतिक संबंध असल्याची माहिती होती. त्यामुळे पती-पत्नीमध्ये वाद होत असत. पोलीसांनी दैवशाला गोलेवार हिला अनेकवेळा पोलीस ठाण्यात बोलवून तीची कसून चौकशी केली. तेव्हा तीने उडवाउडवीची उत्तरे दिली. दैवशाला गोलेवार व सुभाष यतरवाड यांच्या मोबाईलचे कॉल डिटेल रेकॉर्ड तपासले असता दोघांमध्ये दररोज अनेकवेळा संभाषण होत असल्याचे आढळून आले. तांत्रिक बाबी, विसंगत विधाने, परिस्थितीजन्य पुरावे गोळा करुन पोलीसांनी दैवशाला गोलेवार हिला ताब्यात घेवून तीची कसून चौकशी केली असता तीने खुनाची कबुली दिली. पती रामकिशन गोलेवार याचा दगडाने ठेचून खून करुन प्रेत शेतात पुरल्याची कबुली तीने दिली. पोलीसांनी दैवशाला व तीचा प्रियकर सुभाष यतरवाड या दोघांनीही अटक केली. आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेले हत्यार, दगड, मयताच्या अंगावरील कपडे व डीएनएचे नमुने जप्त केले आहेत. या प्रकरणी मरखेल पोलीस ठाण्यात दोन जणांविरुध्द खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# खरीप हंगामाच्या तोंडावर वरुण राजाची दडी; पेरणीसाठी शेती सज्ज,पण पाऊसच येईना

माहूर/प्रतिनिधी-खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच पावसाने दडी मारल्याने माहूर तालुक्यातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. रोहिणी नक्षत्र कोरडे गेल्यानंतर मृग नक्षत्रालाही सुरुवात झाली असली तरी अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे पेरणीसाठी शेतांची मशागत पूर्ण करून बियाणे व खतांची तयारी केलेले शेतकरी आता आकाशाकडे डोळे लावून बसले आहेत.

शेतीप्रधान आणि आदिवासीबहुल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माहूर तालुक्यातील सुमारे ७० ते ८० टक्के नागरिकांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून आहे. तालुक्यातील ९२ गावांमधील शेतकऱ्यांना दरवर्षी कधी अतिवृष्टी, कधी दुष्काळ, तर कधी रोगराईचा सामना करावा लागतो. यंदा मात्र पावसाच्या उशिरामुळे खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच संकटाचे सावट निर्माण झाले आहे.अनेक शेतकऱ्यांनी शेतांची पूर्व मशागत पूर्ण करून बियाणे आणि खतांची खरेदी केली आहे. मात्र, आकाश ढगाळूनही पाऊस बरसत नसल्याने पेरण्या रखडल्या आहेत. शेत तयार आहे, बियाणे तयार आहे; पण पाऊसच नाही, अशी हताश प्रतिक्रिया शेतकरी गुमान चुगडे यांनी व्यक्त केली आहे.तालुक्यातून वाहणारी पैनगंगा नदी आणि नदीवरील काही बंधाऱ्यांमुळे मर्यादित क्षेत्राला पाण्याचा आधार मिळत असला तरी बहुतांश शेती ही पूर्णतः पावसावर अवलंबून आहे. कापूस, सोयाबीन आणि तूर ही तालुक्यातील प्रमुख खरीप पिके असून, यंदा चांगल्या उत्पादनाच्या अपेक्षेने शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात तयारी केली आहे.मृग नक्षत्रात चांगला पाऊस होऊन खरीप हंगामाला वेग मिळावा, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत. मात्र, पावसाने आणखी उशीर केल्यास पेरण्या लांबणीवर पडण्याची आणि त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.हवामान तज्ज्ञांच्या मते प्रशांत महासागरातील पाण्याच्या तापमानात होणाऱ्या बदलांचा परिणाम मान्सूनवर होत असतो. अशा परिस्थितीत पावसाअभावी रखडलेल्या पेरण्यांमुळे बळीराजा चातकाप्रमाणे वरुणराजाच्या आगमनाची वाट पाहत आहे.

# मृग नक्षत्र कोरडेच;शेतकरी चिंतेत!

देगलूर/प्रतिनिधी-मृग नक्षत्र सूरू होऊन आठवडाभराचा कालावधी उलटून गेला असला तरी तालुक्यात अद्याप समाधानकारक पावसाने हजेरी लावली नाही. खरीप हंगामाची तयारी पूर्ण करून शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसले असून पावसाच्या आगमनाची प्रतीक्षा दिवसेंदिवस वाढत आहे.

पाऊस पडेल या आशेवर काही शेतकऱ्यांनी हळद, कापूस, सोयाबीन, मुग, उडीद, तूर, आधी पिकांची लागवड केली आहे. मात्र अपेक्षित पाऊस न झाल्याने या लागवडी धोक्यात आले आहेत.मृग नक्षेत्रातही मे महिन्याप्रमाणे कडक उन्हाचा तडाखा कायम असल्याने शेतकऱ्यांची चिंता अधिक वाढली आहे. १८ जून पर्यंत देगलूर तालुक्यात उष्णतेची तीव्रता कायम असून वातावरणात दमदारपणा असला तरी पावसाची चिन्हे स्पष्टपणे दिसून येत नाहीत. दरम्यान देगलूर तालुक्यातील काही भागात वाजले वाल्यांनी जोरदार हजेरी लावली. या सुसाट वाऱ्यामुळे अनेक गोरक्ष म्हणून पडले. तर काही ठिकाणी झाडांच्या मोठ्या फांद्या तुटून नुकसान झाले. वादळाच्या तडाख्यात अनेक ठिकाणी वीज पडून बैल जनावरे जखमी होऊन व काही ठिकाणी शेळ्या, मेंढ्या, पिल्ले मरण पावल्याची घटना घडली असून शेतकऱ्यांची आर्थिक नुकसान ही झाले आहे. याशिवाय अनेक ठिकाणी वीज खांब कोसळले आहेत. एकँदरीत खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच पावसाने जडी मारल्याने शेतकरी वर्ग हवा आहे. घाईगडबडी त लागवड केलेल्या शेतकऱ्यापुढे दुबार पेरणीची संकट उभे टाकण्याची शक्यता निर्माण झाली असून येत्या काही दिवसात चांगला आहे तर खरीप हंगामावर त्याचा विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

# नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणूक:भोकरची जागा राष्ट्रवादीला सोडा

भोकर/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत महायुती होणार असल्यास ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला सोडावी अशी एक मुखी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून करण्यात आली असून युती न झाल्यास राष्ट्रवादी आपला स्वतंत्र उमेदवार उभा करणार आहे.असा निर्धार राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीत करण्यात आला.

विधान परिषद निवडणुकीत महायुती झाली असल्याने राष्ट्रवादी पक्षाकडून महायुतीचे उमेदवार अमर राजूरकर यांच्या प्रचार करत आहे नांदेड जिल्हा मध्यवर्ती निवडणूक जवळ आली असल्यास या निवडणुकीत जर युती झाली तर भोकरची जागा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला सोडावी अशी एकमुखी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी भोकर येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, राष्ट्रवादी चे नेते नागनाथ घिसेवाड यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत केली आहे. या बैठकीत राष्ट्रवादी चे आनंदराव पाटील बोरगावकर यांनी हि जागा राष्ट्रवादी काँग्रेस ला सोडावी असा ठराव मांडला या ठरावाला सर्वांनी पाठिंबा देत एक मुखी मागणी केली. जर युती न झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेस कडून स्वतंत्र उमेदवार उभे करणार आहे.या बैठकीला तालुकाध्यक्ष सुरेश बिल्लेवाड माजी नगरसेवक सुभाष पाटील घंटालवार, आनंदराव पाटील बोरगावकर, दत्तात्रय पांचाळ, चेअरमन रामू गोदेवाड, नागोराव शेंडगे, आप्पाराव राठोड, अफरोज पठाण, जवास बरबडेकर, सखाराम वाघमारे, डॉ. विजयकुमार बोनदिलवाड, श्रीकांत किन्हाळकर, शिवाजी पा लगळुदकर, आनंद पाटील ढवळे, विकास आलेवाड, साईनाथ शानमवाड, पांडुरंग पा शिंदे, वामन पा मिराशे, हनुमंत पाटील नटुरे पुंडलिक तोडकर यांची उपस्थिती होती.मागील काही महिन्यांपासून नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस बळ वाढले असून मागील झालेल्या नगर परिषद निवडणुकीत याचा प्रत्यय आला होता. भोकर तालुक्यातील अनेक सेवा सहकारी सोसायटी वर राष्ट्रवादी चे वर्चस्व आहे. यामुळे महायुती झाल्यास हि जागा राष्ट्रवादी काँग्रेस ला सोडावी लागेल.

## नाही तर स्वतंत्र राहू

विधान परिषदेच्या निवडणुकीत महायुती झाली असल्याने आम्ही भाजपाचे उमेदवार अमर राजूरकर यांचा प्रचार करत आहोत. जर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत पुन्हा सन्मानपूर्वक युती झाली आणि जिल्ह्यात सन्मानपूर्वक जागा नाही सुटल्यास तर आम्ही स्वतंत्र लढू.

- बाळासाहेब पाटील रावणगावकर
(जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस, नांदेड)

# पोखरा योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह;मांडवी परिसरातील शेतकरी लाभापासून वंचित

## ईश्वर चव्हाण यांचा आरोप

मांडवी/प्रतिनिधी- शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने 'पोखरा' (नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प) योजना सुरू केली. मात्र, या योजनेचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला आहे का, याचे सिंहलोकन करण्याची वेळ आता आली आहे.

मांडवी परिसरातील रामजी नाईक तांडा आणि जरूर या दोन गावांची पोखरा योजनेत निवड होऊनही येथील शेतकऱ्यांना योजनेचा कोणताही फायदा मिळाला नाही, असा गंभीर आरोप राजीव गांधी पंचायत राज संघटक व सामाजिक कार्यकर्ते ईश्वर चव्हाण यांनी केला आहे. शेतीचा विकास व्हावा आणि शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढावे या हेतूने शासनाकडून पोखरा योजनेअंतर्गत विविध उपक्रम राबवले जातात. यामध्ये शेततळे, तुषार व ठिबक सिंचन, आणि इतर कृषी घटकांसाठी अनुदान दिले जाते. मांडवी परिसरातील अत्यंत गरजू आणि दुर्गम भागातील रामजी नाईक तांडा व जरूर या दोन गावांची या योजनेसाठी निवड करण्यात आली होती. यामुळे येथील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या.शासनाने कागदावर गावांची निवड केली खरी, पण प्रत्यक्षात प्रशासकीय अनास्था आणि नियोजनाचा अभाव यामुळे योजनेचा लाभ शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलाच नाही. केवळ निवड करून काय फायदा, जर शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडणार नसेल? या संपूर्ण प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. अशी मागणी ईश्वर चव्हाण यांनी केली आहे. गावांची निवड होऊन दीर्घकाळ लोटला, तरीही प्रत्यक्ष अंमलबजावणी शून्य असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. योजनेचे माहिती कशी मिळवायची, फॉर्म कसा भरायचा, मंजुरी कशी मिळवायची, याबाबत कृषी विभागाकडून योग्य मार्गदर्शन मिळाले नसल्याचे शेतकरी सांगतात. वारंवार पाठपुरावा करूनही अधिकाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याने शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. या दोन गावांतील बहुतांश शेतकरी हे अल्पभूधारक आणि कोरडवाहू शेती करणारे आहेत. पोखरा योजनेचा लाभ मिळाला असता, तर त्यांच्या उत्पन्नात भर पडली असती. परंतु, योजनेच्या या बोजवाऱ्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.आता या प्रकरणी संबंधित कृषी विभाग आणि वरिष्ठ अधिकारी काय पावले उचलतात आणि रामजी नाईक तांडा व जरूर येथील शेतकऱ्यांना त्यांचा हक्क कधी मिळवून देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अन्यथा शेतकऱ्यांच्या न्यायासाठी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

# भरधाव मोटरसायकलच्या धडकेतील वृद्धाचा मृत्यू

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील स्मशानभूमी ते छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गावर भरधाव मोटरसायकलच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या विठ्ठल संभाजी पवार (वय ७०, रा.पांगरी) यांचे उपचारा दरम्यान निधन झाले. ही घटना १६ जून रोजी दुपारी घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, विठ्ठल पवार हे रस्त्याच्या कडेला पायी जात असताना भरधाव वेगाने आलेल्या मोटरसायकलने त्यांना जोरदार धडक दिली. अपघातात ते गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी त्यांना तातडीने लोहा येथील रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना नांदेड येथील विष्णुपुरी शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचार सुरु असतानाच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे पांगरी गावात शोककळा पसरली असून भरधाव वाहनांमुळे वाढणाऱ्या अपघातांबाबत नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. शहरातील मुख्य मार्गावर वेगमर्यादेचे पालन व्हावे, अशी मागणीही नागरिकांकडून करण्यात येत आहे.



हिमायतनगर येथे एफडीए व स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी धाड टाकुन चार लाख रुपयांचा गुटखा व एक कार जप्त केली आहे. याप्रकरणी दोन जणांना अटक करण्यात आली.

# महिलेच्या पर्समधून दागिणे लंपास

नांदेड/प्रतिनिधी-बसमध्ये चढत असतांना एका महिलेच्या पर्समधून सोन्याचे दागिणे अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना मंगळवारी दुपारी नायगाव येथील बसस्थानकात घडली आहे.

सुरेखा काशिनाथ गायकवाड (वय ३२) रा.लोहा ह्या मंगळवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास नायगाव येथील बसस्थानकातून देगलूर ते नांदेड जाणाऱ्या बसमध्ये चढत असतांना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समधील ५५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिणे चोरुन नेले आहे. सुरेखा गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नायगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस जमादार सांगलीकर हे करत आहेत.

पान १ वरुन

## सहा खासदारांची बैठकीला...

अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे पत्र देण्याची तयारी सुरू केली आहे. मात्र, बंडखोर खासदारांकडे दोन-तृतीयांश बहुमत असल्याने कायदेशीर लढाईत त्यांची बाजू मजबूत मानली जात आहे.

### ठाकरेंसमोर नवे आव्हान

२०२२ मधील शिवसेनेतील फुटीनंतर आता संसदेतही ठाकरे गटाला मोठा धक्का बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सहा खासदारांचे पक्षांतर अधिकृतरीत्या निश्चित झाल्यास आगामी निवडणुकांच्या तोंडावर ठाकरे गटासमोर संघटनात्मक पुनर्बांधणीचे मोठे आव्हान उभे राहणार आहे.

## नांदेड विधान परिषदेसाठी...

आले. ४५२ मतदारांपैकी ५४१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. भोकर येथील मतदान केंद्रावर ४८ पैकी ४७ मतदारांनी मतदान केले. एक महिला हज यात्रेसाठी गेल्यामुळे त्या गैरहजर होत्या. नांदेड येथील मतदान केंद्राला माजी मुख्यमंत्री तथा खा.अशोक चव्हाण यांनी भेट देवून मतदानाचा आढावा घेतला होता. यावेळी भाजपचे पदाधिकारी व नगरसेवक उपस्थित होते. भाजप किंवा काँग्रेसला मतदान करण्याचे पक्षश्रेष्ठींचे आदेश नसतांना सुध्दा एमआयएम पक्षाच्या नगरसेवकांनी मतदानात सहभाग नोंदवला. एमआयएमच्या पंधरा नगरसेवकांनी मतदान केले आहे. एमआयएमचे मतदान कोणाला पडले याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. भाजपचे उमेदवार अमरनाथ राजूरकर यांनी जवळपास साडेतीनशे ते चारशे मतदान मिळतील असे नियोजन केले होते. यापूर्वी अमरनाथ राजूरकर यांनी नांदेड विधान परिषदेच्या निवडणुकीत विजय मिळविला होता. आता विजयाची हॅट्रीक मिळविण्याच्या उंबरठ्यावर ते पोहचले आहेत.

पान १ वरुन

## अमेरिका-इराण युद्धाला...

स्वागत केले. हे अजिबात सोपे नव्हते, अशी प्रतिक्रिया देत ट्रम्प यांनी या करारासाठी पडद्यामागे मोठ्या प्रमाणावर राजनैतिक प्रयत्न झाल्याचे सूचित केले. दरम्यान, इराणची अधिकृत वृत्तसंस्था 'इर्ना'ने दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियन यांनी तेहरानमध्ये कराराच्या इराणी प्रतीवर स्वाक्षरी केली. इराणच्या सरकारी माध्यमांनी दोन्ही राष्ट्राध्यक्षांचे स्वाक्षरी केलेले छायाचित्र प्रसिद्ध केले असून देशातील नागरिकांनीही या निर्णयाचे स्वागत केले आहे.करारानुसार युद्धापूर्वीची परिस्थिती पूर्ववत करण्याचा प्रयत्न केला जाणार असून तेहरानच्या अणुकार्यक्रमाबाबत अमेरिका आणि इराण यांच्यात पुन्हा शांततापूर्ण चर्चा सुरू होणार आहे. युद्धामुळे दोन्ही देशांना झालेल्या आर्थिक आणि मानवी नुकसानीच्या पार्श्वभूमीवर हा करार अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. या कराराचा सर्वाधिक फायदा जागतिक अर्थव्यवस्थेला होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. युद्धादरम्यान बंद करण्यात आलेली होर्मुझ सामुद्रधुनी आता जहाजांच्या वाहतुकीसाठी पुन्हा खुली करण्यात येणार आहे. जगातील सुमारे एक तृतीयांश तेलपुरवठा या महत्त्वाच्या सागरी मार्गातून होत असल्याने त्याच्या बंदीमुळे निर्माण झालेले ऊर्जा संकट आता कमी होण्याची शक्यता आहे. परिणामी, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत घट होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून त्याचा सकारात्मक परिणाम सर्वसामान्य नागरिकांवरही होऊ शकतो.

## खा.आष्टीकर यांचा प्रतिकात्मक पुतळा...

खा.आष्टीकर यांच्या फोटोला जोडे मारुन त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले. यावेळी महानगरप्रमुख मनोज यादव, तालुकाप्रमुख सुनील पाटील, भाया शर्मा, डॉ.बालाजी पेनुरकर, लालचंद यादव, राजू यादव, नवनाथ जोगदंड, अशोक वाघमारे, अमजद लाला, परवेज खान, अंकुर पटेल, साईनाथ आलमखाने यांच्यासह इतर शिवसैनिक सहभागी झाले होते.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अँण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४